| | |
|---|---|
| MHJN090003062022 | <u>नियमित दिवाणी दावा क्र.६९/२०२२ मधील निशाणी क्र.५ वरील आदेश</u><br><u>(नाजुका **विरुध्द** भरत )</u> |

वादीनी सदरचा अर्ज प्रतिवादीं विरुध्द दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ३९ नियम १ व २ प्रमाणे तुर्तातुर्त मनाई हुकूम मिळणेकरीता दाखल केलेला आहे.

२) प्रस्तुतचा दावा वादीने सदरचा दावा गाव मौजे विल्हाडी, ता बदनापूर जि. जालना येथील गट नं.४८ यांसी एकूण क्षेत्रफळ ४ हेक्टर ७९ आर पैकी १ हे ५५ आर जीन वादी क्र.१ चे पती व वादी क्र. २ तर प्रतिवादी क्र. १ ते ३ यांची वडीलोपार्जीत जमीन आहे. जी साहेबराव लोखंडे (मयत) यांचे नावाने ७५ आर व प्रतिवादी क्र. १ च्या नावाने ८० आर अशी आहे तर याच शिवारातील गट क्र.५० मध्ये एकुण क्षेत्र २ हे ८१ आर पैकी साहेबराव लोखंडे यांच्या मालकीची ६६ आर जमीन तसेच गट क्र.३४ मधील विहीर (सदर मिळकतीस यापुढे **“दावा मिळकत”** असे संबोधण्यात येईल.)

३) थोडक्यात हकीकत अशी आहे की, वादी क्र. २ हा वादी क्र. १ चा मुलगा आहे. वादी हिचे पती शरद साहेबराव लोखंडे हे मयत आहेत. प्रतिवादी क्र.१ हा वादी क्र.१ च्या मयत पती शरदचा भाऊ व प्रतिवादी क्र. ३ व ४ हया बहिणी व प्रतिवादी क्र. २ ही आई आहे. दावा मिळकत ही वादी व प्रतिवादी यांची वडीलोपार्जीत मिळकत आहे. वादी हिचे पती प्रतिवादी यांचे पासुन किरकोळ कौटुंबिक वादामुळे विभक्त राहत होते. त्याचा गैरफायदा घेवुन वादी क्र.१ चे सासरे साहेबराव लोखंडे यांनी गट क्र.४८ मधील ८० आर जमीन प्रतिवादी क्र. २ हिचे नावाने वादी व वादीच्या पतीचे माघारी केली. सन २०१६ मध्ये वादीचे सासरे तसेच सन २०१७ मध्ये वादीचे पती मयत झाले. प्रतिवादी क्र. १ याने बनावट दस्तानुसार प्रतिवादी क्र. २ हिच्या नावे असलेली ८० आर जमीन

स्वतःच्या नावे करुन घेतली.

४) वादी हिचा सदर मिळकतीमध्ये कायदेशीर हिस्सा आहे. वादीने तिच्या हिश्याची मागणी केली असता प्रतिवादी यांनी त्यास नकार दिला. प्रतिवादी हे त्यांच्या नावे दावा मिळकतीच्या ७/१२ पत्रकी असलेल्या नावाच्या नोंदीचा गैरफायदा घेवुन परस्पर इतरांचे हक्कात विक्री हस्तांतरण करु नये याकरीता तुर्तातुर्त अंतरीम मनाई हुकूम मिळण्याकरिता वादी यांनी सदर अर्ज दाखल केलेला आहे.

५) सदर दाव्याच्या कामी प्रतिवादी यांना समन्स पाठविण्यात आले. प्रतिवादी क्र.१ ते ४ हे विधीज्ञांमार्फत हजर झाले. परंतु त्यांनी त्यांची कैफियत न दिल्याने त्यांच्याविरुद्ध सदर दावा दि.२७.०३.२०२३ रोजी कैफियतीशिवाय चालण्याचा आदेश पारीत करण्यात आला.

६) वादीतर्फे विधीज्ञ श्री.ए.व्ही.साबळे यांचा युक्तीवाद ऐकला. प्रतिवादी क्र. १ ते ४ हे दि.२२.१२.२०२२ पासुन गैरहजर असल्याने सदर अर्ज प्रतिवादी क्र. १ ते ४ यांच्या विरुद्ध युक्तीवादाशिवाय गुणदोषावर निकाली काढण्यात येत आहे.

७) अर्ज, दाव्यातील कागदपत्रे यांचे अवलोकन केले असता, खालील मुद्दे उपस्थित होतात. त्यावरील निष्कर्ष कारणांसहित खालीलप्रमाणे नोंदविले आहे.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
| --- | --- | --- |
| १. | वादी हे सिध्द करतात का की, प्रथमदर्शनी दावा वादींच्या लाभात आहे ? | होकारार्थी |
| २. | वादी हे सिध्द करतात का की, दाव्याचा समतोल वादींच्या बाजुने आहे ? | होकारार्थी . |

| | | |
| --- | --- | --- |
| ३. | वादी हे सिध्द करतात का की, सदर अर्ज नामंजुर केल्यास वादींचे अपरीमीत नुकसान होईल ? | होकारार्थी . |
| ४. | आदेश काय ? | अंतिम आदेशाप्रमाणे. |

## –: कारणमिमांसा :–

८) वादीने सदर दाव्याच्या पुष्ठयर्थ दाखल केलेली कागदपत्रे ही मुद्दा क्र.१ ते ४ चे निष्कर्ष नोंदवितांना आवश्यकतेनुसार विचारात घेण्यात येत आहे. प्रतिवादी यांनी त्यांची कैफियत अगर कोणतेही कागदपत्रे दाखल केलेली नाही.

## –: मुद्दा क्र.१ ते ४ करीता :–

९) वरील मुद्दा क्र.१ ते ४ हे एकमेकांशी संलग्न असल्याने त्यांची पुनरावृत्ती टाळण्याकरीता एकत्र चर्चेत घेतले आहेत. अभिलेखाचे अवलोकन केले असता असे निदर्शनास येते की, वादीने सदरचा दावा प्रतिवादी यांच्या विरुद्ध वाटणी आधारे स्वतंत्र ताबा मिळणे घोषणा व मनाई हुकूम मिळणे बाबत दाखल केलेला आहे. वादी ही प्रतिवादी क्र. १ ते ४ यांच्या एकत्र कुटूंबातील सदस्या आहेत.

१०) वादीने दाखल केलेल्या कागदपत्रानुसार दावा मिळकतीच्या ७/१२ पत्रकी प्रतिवादी यांच्या नावाची नोंद आहे. वादी यांचा दावा हा वाटणी आधारे ताबा मिळणेबाबतचा असल्याने वादी यांना त्यांचा कायदेशीर हिस्सा मिळणेबाबत त्यांनी सदरचा दावा दाखल केला आहे. सदर दावा गुणदोषावर चालवुन निकाली निघण्याकरीता वेळ लागणार आहे. तोपर्यंत दावा मिळकतीचे अस्तीत्व टिकवुन ठेवण्यासाठी दावा मिळकतीत तिऱ्हाईत इसमांचे हक्क प्रस्तापित होवु नये याकरीता मनाई हुकूम पारीत करणे आवश्यक आहे. प्रतिवादी क्र. १ ते ४ यांच्याविरुद्ध दावा

कैफियतीशिवाय चालल्याने प्रतिवादी यांच्या नावे ७/१२ पत्रकी दाखल असलेले क्षेत्र हे व्यवहाराद्वारे हस्तांतरण झाले तर दाव्यात गुंतागुंत निर्माण होणार आहे.

११) एकंदरीत दावा मिळकत ही प्रतिवादी यांची स्वकष्टार्जीत मिळकत असल्याचे प्रतिवादींनी दाव्यात हजर राहुन पुरावे दाखल केलेले नाही. त्यामुळे दावा मिळकत ही वडीलोपार्जीत मिळकत असल्याचे या घडीला नाकारता येणार नाही. त्यामुळे वादी यांनी प्रथमदर्शनी दावा त्यांच्या लाभात असल्याबाबत तसेच दाव्याचा समतोल हा देखील त्यांचे लाभात असल्याबाबत सिद्ध केले आहे. अगर अशा परिस्थितीत सदरचा अर्ज मंजूर केल्यास प्रतिवादीचे कोणतेही नुकसान होणार नाही. प्रतिवादी यांना दावा चालविण्याची देखील संधी आहे. परंतु, दाव्याचा निकाल लागेपावेतो प्रतिवादी यांचे विरुद्ध तुर्तातुर्त मनाई मंजूर न केल्यास वादी यांचे अपरिमित नुकसान होईल. याउलट प्रतिवादी यांचे काही एक नुकसान होणार नाही. यामुळे मी मुद्दा क्र. १ ते ३ चे निर्देश होकारार्थी नोंदवित आहे. तसेच मुद्दा क्र. ४ करिता खालील आदेश पारित करीत आहे.

**<u>आदेश</u>**

| | |
|---|---|
| १. | वादी यांचा निशाणी ५ वरील तुर्तातुर्त मनाईचा अर्ज खर्चासह मंजुर करण्यात येतो. |
| २. | सदर दाव्याचा अंतिम निकाल लागेपावेतो प्रतिवादी क्र. १ ते ४ यांनी दावा मिळकतीमध्ये त्यांच्या नावे असलेल्या नोंदीचा गैरफायदा घेवुन दावा मिळकतीत कोणत्याही प्रकारे तिऱ्हाईत इसमांचे हक्क प्रस्थापीत करु नये असा तुर्तातुर्त मनाई हुकूम देण्यात येतो. |

स्वा/-

दिनांकः- ०४.०५.२०२६

(श्री. जी. एन लंघे)

दिवाणी न्यायाधीश क. स्तर, बदनापुर